Remove Watermark Wondershare PDFelement

जळगाव दि. २० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सोपान नांगरे या संशोधक विद्यार्थ्यास राष्ट्रीय स्तरावरील “अन्वेषण २०२३” या संशोधन स्पर्धेत तिसरे पारितोषिक प्राप्त झाले आहे.

गेल्या आठवडयात गुजरात राज्यातील गणपत विद्यापीठ, मेहसाणा येथे राष्ट्रीय स्तरावरील अन्वेषण २०२३ ही संशोधन स्पर्धा पार पडली. सोपान नांगरे यांनी अल्झायमर आजाराचे निदान करण्यासाठी तोंडातील लाळेचा वापर करून तंत्र विकसित केले आहे. नांगरे यांना २५०००/- रूपये व सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. भारतीय विद्यापीठ संघाचे सहसंचालक डॉ. अमरेन्दर पानी यांच्या हस्ते हे पारितोषिक देण्यात आले. सोपान नांगरे यांच्या या यशाबद्दल कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील आणि अन्वेषण स्पर्धेचे समन्वयक डॉ. व्ही. एम. रोकडे यांनी अभिनंदन केले आहे. सोपान नांगरे हे शिरपूरच्या एच. आर. पटेल इन्स्टिट्युट ऑफ फार्मा येथे संशोधक विद्यार्थी म्हणून काम करीत आहेत.

---

बातमी क्रमांक २

जळगाव दि. २० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संगीत विभागाच्यावतीने शनिवार दि. २५ मार्च रोजी सुप्रसिध्द गायिका पंडिता मंजिरी कर्वे-आलेगावकर यांची विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा होणार आहे.

शनिवारी सकाळी १०:३० ते ४:३० या कालावधीत विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र प्रशाळेच्या सभागृहात “नाट्यसंगीतातील बारकावे” या विषयावर मंजिरी कर्वे आलेगावकर या कार्यशाळा घेतील. ही कार्यशाळा सर्वांसाठी खुली असून वयाचे कोणतेही बंधन नाही. नोंदणी शुल्क २००/- रूपये आहे. इच्छूकांनी भ्रमणध्वनी क्रमांक ७०२०२३७८३५ अथवा ९४२२२३५४५८ या क्रमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन या कार्यशाळेच्या समन्वयक अलका चव्हाण यांनी केले आहे.

Wondershare PDFelement

---

बातमी क्रमांक ३

जळगाव दि. २० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागाच्यावतीने जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधून “चिऊचा पाणवठा व परिसर स्वच्छता” हा उपक्रम राबविण्यात आला.

उन्हाळ्यात नैसर्गिक पाणवठ्यात होणारी घट अन्न व पाण्यासाठी चिमण्यांची भंटकती लक्षात घेवून विद्यापीठाच्या परिसरात ठिकठिकाणी पाण्याची भांडी, अन्न व कृत्रिम घरट्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय परिसराची स्वच्छता ही करण्यात आली. शिक्षणशास्त्र विभागप्रमुख डॉ. मनिषा इंदाणी, डॉ. संतोष खिराडे, डॉ. रणजित पारधे, डॉ. स्वाती तायडे, जयश्री पाटील, जयेश पाटील, विष्णू कोळी आदींनी हा उपक्रम राबविला.

---

Remove Watermark Wondershare PDFelement

बातमी क्रमांक ४

जळगाव दि. २० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व मानव्यविद्या प्रशाळातंर्गत संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग व युआयसीटी यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २४ मार्च रोजी "काश्मीरसाठी चीनची धोरणात्मक योजना" या विषयावर राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

भारताच्या गृहमंत्रालयाचे माजी सुरक्षा सल्लागार व सर्व्हिस सिलेक्शन बोर्डाचे माजी अध्यक्ष बिग्रेडिअर संजय अग्रवाल हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या परिसंवादात दक्षिण कोरियाच्या एशिया इन्स्टिट्युट, सेऊलचे संचालक डॉ. लखविंदर सिंग, डिफेन्स इन्स्टिट्युट ऑफ ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी पुणे येथील डॉ. शाईबल बॅनर्जी, इंडियन कौन्सिल ऑफ वर्ल्ड ॲफेअर्सच्या डॉ. अनघा गुहा रॉय हे व्याख्याते म्हणून उपस्थित राहणार आहेत. या परिसंवादात भारत-चीन सिमावाद, चीनचे काश्मीर धोरण अशा विविध विषयावर वक्ते बोलणार आहेत. या परिसंवादात विद्यार्थ्यांनी नोंदणी करून सहभागी व्हावे असे आवाहन प्रशाळेचे प्रभारी संचालक डॉ. अनिल चिकाटे व युआयसीटी चे संचालक डॉ. जे. बी. नाईक यांनी केले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

Wondershare PDFelement